(4)

ईमेलद्वारे


# महात्मा फुले कृषि विद्यापीठ
# राहुरी जि.अहमदनगर

दुरध्वनी क्रमांक : (०२४२६) २४३३७४ फॅक्स क्रमांक : (०२४२६) २४३३७४ /२४३२३८

e.mail : comptrollermpkv@ gov.in


जा.क्र.मफुकृवि/ नियंत्रक/लेखा -२ / ३०८/२०१७ दिनांक ०१ जुले,२०१७

## परिपत्रक

**विषय** : - आदात्याच्या / लाभार्थीच्या बँक खात्यात इलेक्ट्रॉनिक पध्दतीने थेट प्रदान करणेबाबत.

**संदर्भ** : - १) शासन निर्णय वित्त विभाग क्र. संकीर्ण १०१०/प्र.क्र.६८/भाग-२/कोषा प्र-५ दि. १३.०१.२०१३

२) भाकृअप पत्र क्र.F.No.Agri.Edn./1-6/2015-EP & HS Dt. 10.04.2017

१) केंद्र व राज्य शासनाने त्यांचे आर्थिक व्यवहार डिजीटल (Paperless व Cashless) करण्याचे धोरण यशस्वीपणे अंमलात आणले आहे.

शासनाकडून विद्यापीठातील अधिकारी / कर्मचा-यांचे वेतन - भत्ते थेट बँक खात्यात जमा होत असून त्याच प्रमाणे विद्यापीठ अंतर्गत विविध जमा व खर्च होणा-या रकमांचे व्यवहार रोख अथवा कागदी (धनादेश / धनाकर्ष) स्वरूपात न करता ते डिजीटल स्वरूपात करणे आवश्यक आहे. विद्यापीठाचे आर्थिक व्यवहार अधिकाधिक इलेक्ट्रॉनिक / डिजीटल स्वरू पात करून रोखीचे व्यवहार किमान अथवा शुन्य पातळीवर आणण्याची अपरिहार्यता निर्माण झाली आहे.

२) विद्यापीठास उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय व पत्रान्वये असे निर्देश प्राप्त आहेत कि वेळेचा अपव्यय होऊ नये, तसेच पारदर्शकता असावी या दृष्टीने सर्व प्रकारची प्रदाने आदात्याच्या / लाभार्थीच्या बँक खात्यात इलेक्ट्रॉनिक पध्दतीने थेट प्रदाने करावीत. या अनुषंगाने दि. १६.०६.२०१७ रोजी राहुरी येथे झालेल्या बैठकीत निर्देशित केल्याप्रमाणे सर्व अधिदान व लेखा अधिकारी, सहाय्यक नियंत्रक १/२/४ यांनी धनादेशाचा वापर पूर्ण पणे बंद करून सर्व प्रकारची प्रदाने EFT / NEFT/ RTGS द्वारेच करावीत. रू. ५,०००/- वरील कोणत्याही प्रदानासाठी धनादेश / धनाकर्ष देण्यात येऊनयेत. रेखांकीत व ' Your self ' नमुद करून बँकेच्या नावे दयावयाच्या धनादेशांचा अपवादात्मक वापर केवळ शासकीय / निमशासकीय

प्रदाने, विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थाची प्रदाने व अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत रू. ५,०००/- च्या आतील किरकोळ व रोख स्वरूपातील प्रदानांसाठीच करावा.

३) रू. ५,०००/- चे आतील किरकोळ स्वरुपाची आवश्यक प्रदाने अधिकारी / कर्मचारी यांनी स्वत:च्या खर्चाने केल्यास अशा खर्चाची प्रतिपूर्ती थेट त्या अधिकारी / कर्मचा-याच्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल. या प्रतिपूर्तीच्या जमा रकमा जरी वैयक्तिक बँक खात्यात जमा होणार असल्या, तरी त्यांचा त्या अधिकारी / कर्मचा-याच्या वैयक्तिक आयकर दायीत्वाशी काहीही संबंध असणार नाही. आवश्यकता निर्माण झाल्यास तसे प्रमाणपत्र कार्यालयामार्फत देण्यात येईल.

४) सदर कार्यपध्दती केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या सर्वंकष धोरणाचाच एक भाग असल्याने, त्यानुसार अंमलबजावणीबाबत सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी. या संदर्भात काही समस्या उदभवल्यास लेखा व अधिदान अधिकारी अथवा नियंत्रक कार्यालयाशी तात्काळ संपर्क साधून निराकरण करून घ्यावे. सर्व योजना प्रमुख / सर्व आहरण व संवितरण अधिकारी तसेच सर्व अधिदान व लेखा अधिकारी यांनी प्रदाने संबंधी कार्यवाही आपले स्तरावर करावी.

**वरील कार्यपदधती दि. ०५/०७/२०१७ पासून अंमलात यावी.**

मा.कुलगुरू यांच्या मंजूर टिपणी अन्वये

**नियंत्रक**
**म.फु.कृ.वि., राहुरी**

प्रत- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी समादराने अग्रेषित..

१. संचालक, विस्तार शिक्षण /कृषि शिक्षण/ संशोधन, मफुकृवि, राहुरी
२. सहयोगी अधिष्ठाता, प.म./डॉ.आ.शि.कृ.अभि.म.विद्यालय/निम्नस्तर शिक्षण, मफुकृवि, राहुरी
३. सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, पुणे/ धुळे/कोल्हापूर/ नंदुरबार व कराड, नोडल ऑफिसर, मुक्ताईनगर / हळगांव
४. विद्यापीठ ग्रंथपाल/ सुरक्षा अधिकारी/ विद्यार्थी कल्याण अधिकारी/विद्यापीठ अभियंता, मफुकृवि, राहुरी
५. सहयोगी संशोधन संचालक, पुणे/धुळे/कोल्हापूर/इगतपुरी व सोलापूर
६. उप-कुलसचिव (प्रशासन/विद्या), सहा.नियंत्रक/सहा. कुलसचिव (सर्व)
७. अधिदान व लेखा अधिकारी, पुणे/धुळे/कोल्हापुर/राहुरी/ अति. अधिदान व लेखा अधिकारी, मफुकृवि, राहुरी
८. सर्व आहरण व संवितरण अधिकारी/योजना प्रमुख/संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी
९. प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालये (सर्व), कृषि तंत्र विद्यालय, मालेगाव
१०. मा. कुलगुरु,कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, मफुकृवि, राहुरी